लोकमत

# 'घराणे शब्द तयार होण्यापूर्वी लोकरंगभूमीची स्वतंत्र परंपरा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** आपले आदिम जमातीचे नृत्य लोकरंगभूमीचे पहिले



पाऊल म्हणता येईल. शास्त्रीयतेत 'घराणे' हा शब्द तयार होण्याच्या कितीतरी आधी लोकरंगभूमीने स्वतंत्र परंपरा निर्माण केली होती, असे मत मराठी भाषा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केले.

इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेच्या यशोदा महादेव काकडे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात साहित्य अकादमी आणि इंद्रायणी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लोकरंगभूमी आणि अभिजात मराठी' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे, ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, डॉ. प्रकाश खांडगे, डॉ. गणेश चंदनशिवे, ओम प्रकाश नायर, डॉ. अनिल सहस्रबुद्धे, डॉ. मुकुंद कुळे, संतोष शेणई, सोपान खुडे, प्रभाकर ओव्हाळ, कार्यवाह चंद्रकांत शेटे, निरुपा कानिटकर, प्राचार्य डॉ. संभाजी मलघे उपस्थित होते. डॉ. प्रकाश खांडगे यांनी अभिजात भाषांनी बोलीभाषांना गावकुसाबाहेर ठेवले असल्याची खंत व्यक्त केली. वामन केंद्रे म्हणाले की, प्रयोगरूपाने आविष्कृत होणारी भाषा म्हणजे रंगभाषा होय. विश्वास पाटील म्हणाले की, कुठलीही कला स्थळकाळाचा नवा स्वर जोपर्यंत पकडत नाही, तोपर्यंत ती जिवंत राहू शकत नाही. परिसंवादात वगनाट्य, लोकनाट्य व तमाशाची रंगभाषा व अभिजात मराठी या विषयावर चर्चा झाली. डॉ. गणेश चंदनशिवे, सोपान खुडे, लोककला अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ यांनी मार्गदर्शन केले.